Research Papers

संतकवी तुकाराम

डॉ.चंद्रकुमार राहुले
जगत कला,वाणिज्य व इं.ह.पटेल
विज्ञान महाविद्यालय,गोरेगावं

प्रास्ताविक :

वारकरी संप्रदायात तुकारामाच्या कवितेला अनन्यसाधारण महत्व आहे. मराठी कवितेत तुकारामाची कविता आपल्या अस्सल मराठमोळया शैलीने आपले लक्ष वेधून घेते. 'ज्ञानदेवे रचिला पाया..... तुका झालासे कळस' असे वारकरी संप्रदायात तुकारामाच्या सांस्कृतिक कार्याचे वर्णन करण्यात येते. प्राचीन मराठी कवींमध्ये सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्यात तुकारामाची कविता श्रेश्ठ व उपकारक ठरली आहे. तुकारामाच्या काव्यातील समकालीन, सामाजिक व लौकिक आदिबंधाने प्रतिमांकित अशा रोखठोक व वास्तवपूर्ण काव्यसंकेताने लौकिक पातळीवर उतरल्याचा प्रत्यय येतो.

शिवकालीन एक थोर साक्षात्कारी संत आणि प्रतिभासंपन्न कवी म्हणून तुकाराम बोल्होबा आंबिले हयांचा नामोल्लेख आदराने केला जातो. संत तुकाराम म्हणजे संत नामावलीतील एक 'बंडखोर संत' म्हणून ओळखले जातात. आपल्या वाणींने, कर्तृत्वाने आणि जीवनानुभवाने परमेश्वराशी ते सतत झगडत राहिले. त्यांच्या अंभगवाणीतून एका अनुभवी संताचे आणि विचारवंताचे अंतरंग उलगडत जाते. संत तुकाराम म्हणजे निसर्गाशी एकजीव झालेला, अनुभवाशी समरस झालेला आणि आपल्या अंभगाद्वारा मराठी माणसांच्या ओंठावर आपसूकपणे, लडिवाळपणे स्मरणारा आणि मराठी मनाच्या हदयाकाशावर अधिराज्य गाजवणारा अनुभवसंपन्न साक्षात्कारी संत होय.

तुकारामांच्या जीवनात जी भावनात्मक स्थित्यंतरे घडून आली त्याचा व्यामिश्र आलेख त्यांच्या अंभगात शब्दांकित झाला. तुकारामाची कविता अस्सल देशी कविता आहे. वयाच्या सतराव्या वर्शी आईवडिल व भावजयीचे जाणे, सावजीचे संन्यास घेणे, एकविसाव्या वर्शी भीशण दुश्काळाचे दर्शन व त्यात बायको व मुलाच्या मृत्यूचे तांडव या दाहक वास्तवाच्या अनुभवाने तुकारामांना पावलोपावली अंतर्मुख होण्यास भाग पाडले आहे. त्यांना चोविसाव्या वर्शी झालेला गुरूपदेश व त्यानंतर झालेली कवित्वस्फूर्ती, रामेश्वरभट व सालोमालो यांनी केलेला अमानुश छळ व या सर्वांवर कळस म्हणजे तुकोबारायांचे निर्वाण होय, या सर्व घटनांचा आलेख त्यांच्या अंभगातून स्पश्टपणे जावणतो. तुकोबारायांचे अभंग म्हणजे त्यांचे जणूकाय आत्मचरित्रच होय. लौकिक व पारलौकिक जीवनातील विविध सुखदुःखांच्या अनुभवाचा तो जळता दीपस्तंभच होय.

संत तुकारामांची अभंगगाथा ही महाराश्न्भü शारदेचे एक अतिशय मौलिक आभूशण आहे. जीवनातील बरेवाईट अनुभव पचवत सामान्यातून संतत्वापर्यंत झालेला मानसिक विकासाचा आलेख म्हणजे तुकारामांचे उत्कट अभंग होय. एका उत्कट मनाच्या संवेदनशील व्यक्तीने आपल्या भावानुभूतीचा तळ गाठून सूत्रबद्वरीतीने शोधून काढलेले अनुभव सत्य म्हणजे तुकारामांचे अभंग होत.

संत तुकारामांच्या जीवनातील विकासप्रक्रियेच्या तीन अवस्था स्पश्टपणे जाणवतात. त्यांच्या जीवनातील पहिली अवस्था म्हणजे त्यांनी ऐहिक जीवनाबद्वल पूर्णपणे वैराग्य धारण करुन परमेश्वराशी साक्षात्कार साधावयाचा केलेला दृढनिश्चय; दुसरी अवस्था म्हणजे परमेश्वराचे दर्शन न झाल्याने त्यांना आलेली घोर निराशा आणि तिसरी अवस्था म्हणजे या दोन्ही परस्पर विरोधी दिसणा–या अवस्थांचा समन्वय होऊन ईश्वराचे दर्शन घडणे, सदेह वैकुंठास जाणे.

संत तुकाराम हे काव्यनिर्मितीचे प्रयोजन संतानी प्रतिपादन केलेल्या ईश्वरी वा दैवी देणगीलाच दिलेले आहे. ते प्रतिभा ही ईश्वरदत्त वा निसर्गदत्त देणगी मानतात. कवित्वस्फूर्ती ही परमेश्वरी कृपेशिवाय होऊ शकत नाही, असे ते निक्षून सांगतात. आपल्या काव्याविशयी सांगतांना ते म्हणतात की, 'आपुलिया बळे नाही मी

बोलत। सखा भगवंत वाचा त्याची' वाणी ही भगवंताने मानवाला दिलेली देणगी आहे. शब्द हे साहित्याचे महत्त्वाचे अवयव आहे, असा साहित्यविशयक दृश्टिकोन ते स्वीकारतात. साहित्यिक होण्याकरिता, साहित्यलेखनाकरिता शब्दांचीच आवश्यकता असते. शब्दांवाचून काही नाही असा नवा प्रमेय मांडतात. साहित्यिकांकडे, कवींकडे, लेखकांकडे शब्दरुपी धन महत्त्वाचे आहे.

तुकोबारायांचे अभंग म्हणजे प्रसंगोपात्त मनात उसळणा–या ब–या–वाईट, सुख–दुःखाच्या, राग–लोभाच्या भावार्थाचे शाब्दिक प्रकटीकरण होय. 'माझिये जातीचे मज भेटो कोणी । येळयागबाळयाचे काम नव्हे' असे त्यांचे परमेश्वरापाशी मागणे आहे. कधी निसर्गाशी एकरुपतेने वावरताना दिसतात. ''वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे । पक्षी हे सुस्वरे आळविती । तेणे एकांताचा वास । नाही गुणदोश अंगा येत ।।'' निसर्गाशी साधलेला असा विराट अनुभव ते प्रकट करतात. आज जगाच्या पाठीवर पर्यावरण बचाव मोहीम राबविली जाते. 'वृक्ष लावा निसर्ग वाचवा' असा टाहो फोडला जातो. परंतु संत तुकारामाने हे सारे पाचशे वर्शाआधी आपल्या दुरदर्शित्वाने नमूद केले आहे. म्हणून संत तुकाराम हे नुसतेच अध्यात्मवादी संत नव्हते तर ते निसर्गप्रिय संत होते असे मानणे अतिशयोक्ती होणार नाही हा त्यांचा निसर्गाशी एकरुपतेचा अनुभव होता. निसर्गाशी सलगी साधने म्हणजेच परमेश्वराशी तादात्म्य पावणे, समरस व एकजीव होणे होय.

संत तुकाराम महाराज समाजातील दांभिकतेवर, सोवळया अवडंबरावर कडाडून हल्ला चढवितात. ते म्हणतात की, मन स्वच्छ, पवित्र नसेल तर सोवळया–ओवळयाला काही अर्थ नाही. पुस्तकांचा ढीग गोळा केंला पण भक्तीच नसेल तर घोकलेल्या ज्ञानाला काही अर्थ नसतो. अंतरंगात भक्तीचा झरा वाहावा लागतो. दिखाऊ भक्तीला पांडुरंग भुलत नाही. आत्मज्ञानाच्या खूप गप्पा मारल्या पण अंतर्मनात खरी भक्ती नसेल तर त्या बोलण्याला काही अर्थ नसतो. लौकिक जीवनातील मानसन्मान, प्रतिश्ठा दांभिक असते.

संत तुकाराम महाराज अंतर्मनाच्या शुद्विकरणावर भर देतात. ते आंधळयाचा दृश्टांत देतातः आंधळयाला नजर नसते, म्हणून तो काही पाहू शकत नाही. त्याला दिसत नसल्यामुळे सगळया जगाला दिसत नसेल, असे त्याला वाटते. आपल्यावरुन तो जगाची परीक्षा करतो. रोगी माणसांच्या तोंडाला चव नसते. त्याला मिश्ठान्न दिले तरी ते विशाप्रमाणे कडवट लागते. या दृश्टांताद्वारा संत तुकाराम महाराज म्हणतात की, आपण शुद्व नसलो तर त्रिभूवनच अपवित्र आहे, असे वाटते. मन शुद्वअसेल तर सगळे जग चांगले, पवित्र व मंगलमय दिसते. 'मन में चंगा तो कारवड मे गंगा' असा प्रत्यय येतो.